# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक

सर्व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने शिक्षकेतर सेवकांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक अग्रिम देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

या संबंधीची माहिती / नियमावली त्याचप्रमाणे शैक्षणिक अग्रिमासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. १३५/२०१८ जावक क्र. वित्त/२०१८-१९/६८९ दि.०३.०८.२०१८ सोबत जोडलेला आहे. (विद्यापीठ संकेतस्थळावर वित्त व लेखा विभागाच्या परिपत्रकामध्ये उपलब्ध आहे) **शैक्षणिक अग्रिमासाठीचा अर्ज विभागप्रमुख यांचे शिफारशीसह प्रशासन शिक्षकेतर कक्ष यांचे मार्फत वित्त व लेखा विभागाकडे** कार्यालयीन वेळेत दिनांक १६ ऑगस्ट , २०१८ पर्यंत सादर करण्याचे कळविण्यात आले होते.

अद्याप काही शैक्षणिक शाखांची प्रवेश प्रक्रिया अपूर्ण असल्याने शैक्षणिक अग्रिमासाठीचे अर्ज कार्यालयीन वेळेत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत वित्त व लेखा विभागामध्ये जमा करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/८०५
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१८

**सीए (डॉ.) विद्या गारगोटे**
**वित्त व लेखा अधिकारी**
**अतिरिक्त कार्यभार**

**प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
२. मा. शाखाप्रमुख,
सर्व प्रशासकीय शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

यांना विनंती की, सदरील परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षकेतर सेवकांच्या नजरेस आणावे.